**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**

**दुरध्वनी क्रं.** 0712-2870120-21 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/सुचना/ 174 /2025-26 दिनांक :- 02/02/2026

# संघ लोकसेवा आयोग (UPSC) - 2025-26 स्पर्धा परीक्षा पुर्व प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रात रुजु होण्याकरीता विस्तारीत यादीतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सुचना

महाज्योतीमार्फत संघ लोकसेवा आयोग (UPSC) - 2025-26 स्पर्धा परीक्षा पुर्व ऑफलाईन प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांची विस्तारीत यादी महाज्योतीचा संकेतस्थळावर दि.23/01/2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यानुसार विस्तारीत यादीतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेत रुजु होण्याकरीता दि.10/02/2026 रोजी पर्यंत मुदत देण्यात येत आहे.

- **प्रवेश प्रक्रीयेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे** :-
  1. आधारकार्ड
  2. जातीचे प्रमाणपत्र
  3. वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
  4. पदवी उत्तीर्ण गुणपत्रिका /प्रमाणपत्र/ उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र

     (मुळ कागदपत्रे व स्वंय स्वाक्षांकित झेरॉक्स घेवून उपस्थित राहावे.)

- **प्रशिक्षण केंद्रांचे नाव, पत्ता व संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे** :-

1. **युनिक ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र**

   **संपर्क क्र.** 1) गणेश पवार (9175096040), 2) चक्रधर गोरे (9822045272) 3) कैलास शेंडगे (9657183344)

   **पत्ता** - द युनिक ॲकडमी, प्राईड पोर्टल बिल्डींग, शिवाजी हाऊसिंग सोसायटी, ऑफ सेनापती बापट रोड, जेडब्ल्यु मारिओट हॉटेलच्या बाजुला, बहीरतवाडी, पुणे, पिनकोड - 411016

- **<u>प्रशिक्षण केंद्रास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सूचना</u>** :-

1. प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल, याची नोंद घ्यावी.
2. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा यापूर्वी महाज्योतीच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी' या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
3. ज्या विद्यार्थ्यांची निवड महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा), संघ लोकसेवा आयोग (UPSC) व महाराष्ट्र लोकसेवा आयोग संयुक्त गट 'ब' व 'क' या स्पर्धा परीक्षापुर्व प्रशिक्षणाकरीता झालेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी कोणत्याही एकाच प्रशिक्षणाकरीता संबंधित प्रशिक्षण संस्थेत प्रवेश करण्यात यावे.
4. सोबत जोडण्यात आलेल्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेत प्रवेश देण्यात येईल. तसेच कोणत्याही प्रकारची पुरविण्यात आलेली माहिती चुकीची आढळून आल्यास सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येईल.
5. संघ लोकसेवा आयोग (UPSC) या स्पर्धा परीक्षा पुर्व प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना सदरचे प्रशिक्षण दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेमार्फत घ्यावयाचे असल्यास त्याबाबत चे ई-मेल nikita.mahajyoti@gmail.com या मेल आयडीवर महाज्योती कार्यालयास **दि**.03/02/2026 **रोजी** पर्यंत पाठविण्यात यावे. ज्या विद्यार्थ्यांचे ई-मेल महाज्योतीच्या nikita.mahajyoti@gmail.com या मेल आयडीवर प्राप्त होतील केवळ अशाच विद्यार्थ्यांचे दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेकरीता जागा राखीव ठेवण्यात येईल. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.
6. जे विद्यार्थी **दि**.10/02/2026 **रोजी** पर्यंत प्रशिक्षण संस्थेत रुजु होणार नाही अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करुन पूढील प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येईल. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

(स्वा.)
(मिलिंद नारिंगे)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर